# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

दुपार

**दिनांक १३.०७.२०२६ सोमवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक १२.०७.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०९ केसेसमध्ये ११ ईसमांवर कारवाई करून १८,०८,१२०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०१ केसमध्ये ५ ईसमावर कारवाई करुन ४१,९४०/—रू. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,५५८ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,०३,८५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे कपीलनगर :— जिवे ठार मारणारा आरोपी अटकेत.**

दिनांक १२.०७.२०२६ चे १५.३० ते १६.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे कपीलनगर हद्यीत, मौजा नारी, उप्पलवाडी ते कामठी रोड, सहारे पेट्रोल पंपजवळील चहाचे टपरीवर फिर्यादीचे पती नामे मनोज विश्वनाथ यादव वय ४५ वर्ष रा. जी—विंग, क्वार्टर क्र. ३०२, संजीवनी आवास योजना, दर्शन कॉलनी, नंदनवन, नागपूर हे चहा पिण्यास गेले होते. चहाचे पैशांचे कारणावरुन टपरीचालक आरोपी कैलास लालचंद्र गणविर वय ४४ वर्ष रा. अशोक सम्राट नगर, कपीलनगर, नागपूर याचेसोबत त्यांचा वादविवाद झाल्याने आरोपीने दुकानातील चाकुने त्यांचे गळयावर वार केल्याने, ते गंभीर जखमी झाले. पेट्रोलींग करणारे पोलीसांनी सुचना मिळताच, तात्काळ घटनास्थळी येऊन जखमी यांना उपचाराकरीता, मेयो हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषित केले.

याप्रकरणी फिर्यादी श्रीमती रजनी मनोज यादव वय ४१ वर्ष रा. जी—विंग, क्वार्टर क्र. ३०२, संजीवनी आवास योजना, दर्शन कॉलनी, नंदनवन, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे कपीलनगर येथे पोउपनि देशमुख ८४५९४४०९९८ यांनी आरोपीविरुध्द कलम १०३(१) भान्यासं. अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरु आहे.

**२) पोलीस ठाणे मानकापूर :— हद्दपार ईसमास अटक.**

दिनांक १२.०७.२०२६ चे २१.१० वा. चे सुमारास, मानकापूर पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, मानकापूर चौक येथील ठाकूर कटीया भंडार जवळ एक इसम पोलीसांना पाहुन पळुन जात असता, त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव शेख मोहसीन उर्फ बाबा टायगर शेख मुसा वय ३१ वर्षे रा. पेंशन नगर, दस्तगीर मटन दुकानाजवळ, गिट्टीखदान, नागपूर असे सांगीतले. पळून जाण्याचे कारण विचारले असता, उडवा—उडवीचे उत्तरे दिल्याने त्यास पोलीस ठाणे येथे आणुन त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०२

यांचे हद्दपार आदेश क्र. ०१/२०२६ दिनांक ०५.०५.२०२६ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०६ महिन्याकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, फिर्यादी पोउपनि सुनिल डगवाल यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे मानकापूर येथे पोउपनि. अजय जाधव यांनी आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>३) पोलीस ठाणे कोराडी :— घातक शस्त्रासह धुमधाम करणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक १२.०७.२०२६ चे १९.१५ वा. चे सुमारास, कोराडी पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, गुरुवार बाजार मागे, नहरचे बाजुचे सिमेंट रोडवर एक लाल रंगाचा शर्ट घातलेला इसम हातात शस्त्र घेवुन, येणाऱ्या—जाणाऱ्या लोकांना शिवीगाळ करून धुमधाम करीत आहे. अशा माहितीवरून नमुद ठिकाणी गेले असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचा इसम हातात लोखंडी चाकू घेवुन धुमधाम करतांना दिसुन आला. त्यास घेराव टाकून ताब्यात घेतले व निशस्त्र केले. आरोपीस त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव चंदनकुमार रामशंकर पासवान वय २१ वर्षे रा. केवडी, जि. बधुआ, बिहार ह.मु. घोगली, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन एक लोखंडी चाकु किंमती २००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगुन समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी सपोनि विनोद म्हात्रे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कोराडी येथे सपोनि. विनोद जोकार यांनी आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>४) पोलीस ठाणे बेलतरोडी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ११.०७.२०२६ चे ०८.३० वा. ते दिनांक १२.०७.२०२६ चे ०७.१० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत फ्लॅट क्र. ६०४, बी बिंग, रचना साहीरा अपार्टमेंट, नागपूर येथे राहणारे फिर्यादी शिरीष गोविंद कोकडेकर वय ७२ वर्ष हे आपले राहते घराला कुलुप लावुन, मुलाकडे पुणे येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील आलमारीतील रोख ७,५००/—रू. तसेच, सोन्याचे वेगवेगळे दागिने व ०८ विदेशी घडयाळी असा एकुण किंमती २७,६२,२००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे मपोउपनि. सुकन्या चौधरी ७९७७४५००७८ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

## (अकस्मात मृत्यु)

**<u>१) पोलीस ठाणे अजनी</u>:—** दिनांक ११.०७.२०२६ चे १५.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे अजनी हद्दीतील मेडीकल हॉस्पिटल परिसरातील ॲक्सिस बॅकचे ऐटीएमजवळील बोराच्या झाडाखाली एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ६० वर्षे वयाचे, बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना हॉस्पिटल कर्मचारी यांनी उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे वार्ड क्र. ५२ येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान दिनांक १२.०७.२०२६ चे १२.०० वा. डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. मृतकाचे वर्णन—रंग—सावळा, चेहरा—लांबट, बांधा—सडपातळ, उंची— ५फुट ६ इंच, डोक्याचे केस—काळे पांढरे, दाढी—वाढलेली. नमुद वर्णनावरुन मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे अजनी येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरुन पोलीस ठाणे अजनी येथे अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील चौकशी सुरु आहे.

**<u>२) पोलीस ठाणे सक्करदरा</u>:—** दिनांक १२.०७.२०२६ चे १२.०० वा. चे सुमारास, सुखराम नत्थु मानकर वय ८३ वर्ष रा. प्लॉट क्र. ४, मॉ शारदा नगर, वाठोडा हे त्यांचा नातु प्रकाश अशोक मेश्राम वय २५ वर्ष रा. मॉ शारदा नगर, नागपूर याचे पल्सर मोटार सायकल क्र. एमएच ४० एएच १६७५ वर मागे बसून राहते घरुन कुही मांढळ येथे जात असता, पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीत सुरभी बारचे बाजुला, इंडीयन गॅस गोडावून समोर, उमरेड रोड येथे मोटार सायकल चालकाने ब्रेक मारल्याने गाडी स्लीप होवुन दोघेही खाली पडून जखमी झाले. गंभीर जखमी सुखराम मानकर यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल, ट्रामा सेंटर येथे दाखल केले असता, उपचारादरम्यान दिनांक १३.०७.२०२६ चे ०४.०० वा. डॉक्टरांनी सुखराम मानकर यांना तपासून मृत घोषीत केले.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरुन पोलीस ठाणे सक्करदरा येथे मपोउपनि अश्विनी कात्रे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील चौकशी सुरु आहे.

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**